मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरूच!

## थेरगाव, रहाटणीतील अनधिकृत मजल्यांच्या बांधकामांवर हातोडा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण कारवाईत थेरगाव व रहाटणी येथील महानगरपालिकेची परवानगी न घेता अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या मजल्यांचे तसेच पत्रा शेडचे १३,३१५ चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ८ अनधिकृत बांधकामे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली.

थेरगाव येथील कारवाईमध्ये ग क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे यांच्या नेतृत्वात महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच कारवाई दरम्यान या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या निष्कासन कारवाईमध्ये पोकलेन व जेसीबी यांचा वापर करण्यात आला. शिवाय यावेळी अग्निशमन वाहने आणि रुग्णवाहिका याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या.तर महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाई मध्ये थेरगाव येथील गुजरनगर, लक्ष्मणनगर तसेच रहाटणी गावठाण येथील अनधिकृत बांधकामांचा समावेश होता. येथील इमारती मध्ये अनधिकृत पद्धतीने उभारलेले इमारतींचे मजले तसेच पत्र्यांच्या बांधकामांवर महापालिकेच्या वतीने बांधकाम हटविण्याची कारवाई करण्यात आली.



> “ शहरातील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेच्या वतीने कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या शाश्वत विकास सोबतच येथील नागरिकांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. शहरात अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या बांधकाम धारकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# जनहित याचिकाकर्त्यास एक लाखांचा दंड

## मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायनिवाडा; पिंपरीच्या शांतीवन मधील 40 कुटुंबांना मोठा दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी येथील शांतीवन सोसायटीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत राजेश दीपचंद रोचिरामणी यांनी दाखल केलेली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराढे व संदीप. व्हि. मारणे यांच्या न्यायपिठाने फेटाळली त्यासोबत अंतरिम मनाईचा आदेश सुद्धा फेटाळला आहे. चुकीच्या पद्धतीने निराधार आरोपांच्या आधारे दाखल केलेल्या याचिकेबाबत न्यायमूर्तींनी कठोर शब्दात फटकारे ओढत याचिकाकर्त्यास तब्बल एक लाखांचा दंडही ठोठावला.

या निकालामुळे गेल्या चार महिन्यांपासून बांधकाम प्रकल्पावर असलेली स्थगीती उठली असून भवितव्य टांगणीला लागलेल्या ४० कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. विकसक मे. साईबाबा सेल्स प्रा.लि यांना जाणीवपूर्वक त्रास देण्यासाठी, न्यायालयीन प्रक्रियेचा, अधिकार क्षेत्राचा गैरवापर याचिकाकर्त्याने व्यक्तिगत फायद्यासाठी करण्याचा प्रयत्न केल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. प्रकल्प ठिकाण पूररेषेत येते अथवा नाही याचा कुठलाही अभ्यास न करता निराधार आरोप केल्याचे म्हटले आहे.

वरिष्ठ अधिवक्ता सीमिल पुरोहित, सहायक भूषण देशमुख, मयंक बागला यांनी भक्कम युक्तिवाद करत न्यायालयासमोर वस्तुस्थिती मांडली. वास्तविक हा पुनर्विकास प्रकल्प नियमांच्या अधीन राहून साकारण्यात येत आहे. महापालिका प्रशासनाकडून सर्व त्या परवानगया घेण्यात आल्या आहेत. निळ्या पूररेषेत बांधकामाला परवानगी नसताना महापालिकेने या सोसायटीच्या बांधकाम करण्यास विकसकाला परवानगी दिल्याचा आरोप करत याचिकाकर्त्याने शासकीय संस्थांकडे तक्रारी करून उच्च न्यायालयातही याचिका दाखल केली होती.



> “ मा. मुंबई उच्च न्यायालयाने रोचिरामणी यांची रिट याचिका केवळ फेटाळून लावली नाही तर हा न्यायालयीन यंत्रणेचा घोर गैरवापर असल्याचे आढळल्याचा ठपका ठेवला, एक लाखांचा दंडही ठोठावला. साई बाबा सेल्स प्रायव्हेट लिमिटेड व संचालकांवर अनावश्यक दबाव आणण्यासाठी, खंडणीसाठी अनेक अधिकाऱ्यांना क्षुल्लक तक्रारी दाखल केल्याचे न्यायालयाने लक्षात घेतले.सार्वजनिक हिताच्या आडून न्यायालयाचा संपार्श्विक हेतूसाठी वापर केला जाऊ शकत नसल्याचा संदेश दिला आहे.
>
> **– ॲड. मयंक बागला, अधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय.**

### ४० कुटुंबांच्या भवितव्याचा मार्ग सुकर

गेल्या चार महिन्यांपासून या पुनर्विकास प्रकल्पाला स्थगिती होती. त्यामुळे चाळीस कुटुंबांची घर का ना घाट का अशी अवस्था झाली होती. हक्काचा निवारा न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्याने सर्वजण चिंताग्रस्त होते. विकसकासह सर्वांनाच बदनामी व मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागले. मात्र या निकालामुळे टांगणीला लागलेला जीव भांड्यात पडला असून सर्वांच्या भवितव्याचा मार्ग आता सुकर झाला आहे.

# शहरातील पाणीपुरवठा 17 जुलैला बंद!

## पर्वती, चांदणी चौक, वारजे जलशुद्धीकरण केंद्रातील जलवाहिनीच्या दुरुस्तीची कामे केली जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

पर्वती पाणीपुरवठा केंद्रासह चांदणी चौक, वारजे जलशुद्धीकरण केंद्रातील जलवाहिनीच्या दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. त्यामुळे येत्या गुरुवारी (१७ जुलै) कोथरुड, कर्वेनगरसह शहरातील मध्यवर्ती पेठा, तसेच सहकारनगर, कात्रज भागातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या कामामुळे दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (१८ जुलैला) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.



वारजे जलकेंद्र : चांदणी चौक (चौकोनी) टाकी परिसर, पाषाण साठवण टाकी, भूगाव रोड, सेंटिन हिल सोसायटी, मधुवन सोसायटी, बावधन, उजवी भुसारी कॉलनी, डावी भुसारी कॉलनी, चिंतामणी सोसायटी, गुरुगणेश नगर, सूरजनगर, सागर कॉलनी, सारथी शिल्प सोसायटी, पूजा पार्क, शांतिबन सोसायटी परिसर, डुक्कर खिंडीजवळील भाग शास्त्रीनगर, न्यू लक्ष्मीनगर, परमहंसनगर, पाषाण, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, लम्हाणतांडा, मोहननगर, सुस रोड इत्यादी.

गांधी भवन टाकी : काकडे सिटी, होम कॉलनी, सिप्ला फाउंडेशन, रेणुकानगर, वारजे माळवाडी परिसर, गोकुळनगर, अतुलनगर, बी.एस.यू.पी योजना, महात्मा सोसायटी परिसर, भुजबळ टाऊनशिप, एकलव्य कॉलेज परिसर, कुमार परिसर, धनंजय सोसायटी, रोहन गार्डन परिसर, कोथरूड क्षेत्रीय कार्यालय परिसर, अथर्व वेद, स्नेहल अमित पार्क, कांचनगंगा, अलकनंदा, शिवप्रभा मंत्री पार्क, आरोह सोसायटी, शांतिवन गांधी स्मारक, किर्लोस्कर डिझेल कंपनी, मुंबई-पुणे बायपास रस्ता दोन्ही बाजू, श्रीराम सोसायटी, गिरीष सोसायटी, तिरुपतीनगर, कुलकर्णी हॉस्पिटल परिसर, हिंगणे होम कॉलनी, मिलेनियम स्कूल, कर्वेनगर गावठाण, तपोधाम परिसर, रामनगर, गोसावी वस्ती, कॅनॉल रोड. बाणेर, बालेवाडी, बाणेर गावठाण, चाकणकर मळा, पॅनकार्ड क्लबरोड, कर्वेनगर, वारजे, एनडीए रस्ता.

एस.एन.डी.टी. पपिंग स्टेशन : गोखलेनगर, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी, कोथरूड संपूर्ण भाग, वडार वस्ती, स्टेट बँक कॉलनी, श्रमिक वसाहत, हॅप्पी कॉलनी, मेघदूत, तेजसनगर, डहाणूकर कॉलनी, सुतारदरा, किष्किंधानगर, जयभवानीनगर, रामबाग कॉलनी, हनुमाननगर, केळेवाडी, गुजरात कॉलनी, गाढवे कॉलनी, ज्ञानेश्वर कॉलनी, आयडीयल कॉलनी, वडारवाडी, सेनापती बापट रोड, जनवाडी, वैदूवाडी, भोसलेनगर, अशोकनगर, खैरेवाडी, शिवाजी हौ. सोसायटी, भांडारकर रोड, प्रभात रोड, सेनापती बापट रोड, हनुमाननगर, भीमनगर, वेदान्तनगरी, कुलश्री कॉलनी परिसर

चतुःश्रृंगी टाकी परिसर : औंध, बोपोडी, भोईटे वस्ती, पुणे विद्यापीठ, परिसर, चिखलवाडी, खडकी, आनंद पार्क, सानेवाडी, आंबेडकर वसाहत, संकल्प पार्क, सकाळनगर, चव्हाणनगर, अभिमानश्री सोसायटी, नॅशनल, सिंधसोसायटी, औंध गाव परिसर, पॅनकार्ड रोड, वीरभद्रनगरचा काही भाग, समर्थ कॉलनी काही भाग.

### पाणीपुरवठा बंद असणारा भाग

» पर्वती जलशुद्धीकरण केंद्रातून पाणीपुरवठा होणारा भाग – गुरुवार पेठ, बुधवार पेठ, काशेवाडी, क्वार्टर गेट परिसर, गंज पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, डेक्कन, शिवाजीनगर, लोहियानगर, सोमवार पेठ, अरुण वैद्य स्टेडीम परिसर, घोरपडे पेठ, पर्वती दर्शन, मुकुंदनगर, सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणीनगर लेक टाऊन, शिवतेजनगर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, शेळकेवस्ती महेश सोसायटी, बिबवेवाडी गावठाण, प्रेमनगर, आंबेडकरनगर डायस प्लॉट, सॅलसबरी पार्क, ठाकरे वसाहत, पर्वती गावठाण, भाग्योदयनगर, शिवनेरीनगर, मिठानगर, कोंढवा खुर्द, साईबाबानगर.

# महापालिकेतील वाढीव दराच्या घनकचरा निविदा रद्द

## महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही; राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

'पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित निविदा प्रक्रिया पाच ते सात टक्के जास्त दराने आल्याने संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही,' अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.




घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भाजपचे भीमराव तापकीर आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार) आमदार बापूसाहेब पठारे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मिसाळ यांनी ही माहिती दिली.

राज्य शासनाने महानगरपालिकेला या निविदा प्रक्रियेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया रद्द केली आहे. या निविदा प्रक्रियेमुळे महानगरपालिकेला कोणतेही थेट आर्थिक नुकसान झालेले नाही. मात्र, निविदा प्रक्रियेदरम्यान झालेला प्रशासकीय खर्च कोणाकडून वसूल करायचा याबाबत महापालिकेला निर्देश दिले जातील.

तसेच लोकप्रतिनिधींना विशिष्ट निविदांबाबत काही शंका असल्यास किंवा कुठल्या निविदांची सखोल चौकशी आवश्यक आहे, असे वाटत असल्यास त्यांनी संबंधित माहिती देण्याचे आवाहनही मिसाळ यांनी यावेळी केले. संबंधित प्रकरणांमध्ये चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी राबविण्यात आलेल्या निविदेमध्ये १५८ कोटी ४४ लाख रुपये निश्चित करण्यात आले होते. कामाचे स्वरूप, क्षेत्रफळ आणि कामागारांची संख्या सारखीच असतानाही ही रक्कम गेल्या वर्षीपेक्षा ७० ते ८० लाखांनी जास्त असल्याने महापालिकेचे दहा कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्यासंदर्भातील मुद्दा विधानसभेत आमदार तापकीर यांनी उपस्थित केला होता. तसेच, निविदेच्या अटीनुसार ठेकेदाराने स्वतःची किंवा भाडेकराराने वाहने वापरून कचरा उचलणे अपेक्षित असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी तपशील आणि क्रमांक जाणीपूर्वक मागविले नाहीत.

त्यामुळे ५० कामगारांची आवश्यकता असताना दोनशे ते अडीचशे कामगार दाखविण्यात आले होते. त्यांचा कामगार कल्याण निधी, भविष्य निर्वाह निधी तसेच राज्य विमा योजनेत गैरव्यवहार करून विशिष्ट ठेकेदारांना फायदा होईल, अशा अटी निश्चित करण्यात आल्या होत्या. त्यासाठी नवी मुंबई आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेतील निविदा प्रक्रियेचे विश्लेषण, निष्कर्ष आणि केंद्रीय दक्षता आयोगाच्या नव्या तत्त्वांचा दाखला देण्यात आला होता. तसेच काळ्या यादीतील कंपनीला निविदा मंजूर करण्यात आल्याची बाब तापकीर यांनी उपस्थित केला होता.

# थकबाकीदार पुन्हा महापालिकेच्या रडारवर

## महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाच्या 18 कार्यालयाकडून सर्व थकबाकीदारांना नोटिसा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून शहरात ५० हजारांपेक्षा अधिक थकबाकी असणा-या २५ हजार १३० मालमत्ताधारक आहेत. तर ५ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेले ७८४ मालमत्ताधारक आहेत. कर संकलन विभागाच्या १८ कार्यालयाकडून सर्व थकबाकीदारांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. मालमत्ता कर न भरल्यास सर्वांची नळ कनेक्शन तोडणी व मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ता कर थकविणाऱ्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. मालमत्ता कर थकविणाऱ्या मालमत्ता धारकांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. थकबाकीदारांना वारंवार आवाहन करूनही ज्यानी अद्याप थकीत कर भरणा केला नाही, अशा मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच थकबाकीदार मालमत्तांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात येणार आहे. तरी थकबाकीदारांनी आपल्या कराचा तात्काळ भरणा करून जप्तीची कटू कारवाई टाळावी. ज्यांचा कर थकीत आहे, त्यांनी तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.




### धनादेश न वटलेल्यांची मालमत्ता होणार सील

ज्या मालमत्ताधारकांचे धनादेश वटले नाहीत, त्यांना वारंवार सूचना देऊनही रक्कम भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ता धारकांविरोधात महापालिकेने कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेच्या कारवाई पथकाने अशा मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. कर संकलनासाठी महापालिकेची शहरात १८ ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत. कर संकलन मोहिमेसाठी विभागाकडून गट लिपिक, सहायक मंडलाधिकारी यांच्याद्वारे नागरिकांना टेलीकॉलिंग करून कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात येत आहे.

> थकीत मालमत्ता कराच्या वसुलीसाठी कारवाई सुरू केली आहे. नागरिकांना वेळोवेळी नोटिस, दूरध्वनी द्वारे सूचनाही देण्यात आल्या. तरीही अनेक थकबाकी दारांकडून प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे नळजोडणी तोडणे, मालमत्ता जप्ती करणे, अशी कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. तरी मालमत्ता कराचा भरणा करून जप्ती व दंडात्मक कारवाई टाळावी.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### सर्वाधिक थकबाकीदार थेरगावमध्ये

**» सर्वाधिक १४,०६२ थकबाकीदार थेरगावमध्ये असून, त्यानंतर चिखली ११,३९५, चिंचवड परिसरात ९,६४२, सांगवी ८,५०७, भोसरी ७,३९६, किवळे ६,६२५, निगडी प्राधिकरण ६,१७६, मोशी ६,१०६, मनपा भवन ५,९७८, पिंपरी वाघेरे ४,९९९, वाकड ४,९६२, कस्पटे वस्ती ४,८६५, आकुर्डी ४,४९३, चऱ्होली ३,७४६, दिघी-बोपखेल ३,६१८, फुगेवाडी-दापोडी ३,४६८, तळवडे २,९०५, पिंपरी नगर २,६१५.**

# महानगरपालिकेची रुग्णालय कधी होणार कॅशलेस

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची सर्वच रुग्णालये अद्याप कॅशलेस सुविधाअभावी मागे पडलेली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर स्मार्ट सिटीकडे वाटचाल करताना महानगरपालिकेची सर्वच रुग्णालये अद्याप कॅशलेस सुविधाअभावी मागे पडलेली आहेत. रुग्णालयात बाह्य रुग्ण विभागात रोख पैसे भरुनच केसपेपर, बिलाची रक्कम जमा करावी लागत आहे. कॅशलेस सुविधा नसल्याने रुग्णाच्या नातेवाईकांची धावपळ होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेची रुग्णालये कधी होणार कॅशलेस, अशा प्रश्न रुग्णाची नातेवाईक उपस्थित करत आहेत.

शासकीय, निमशासकीय सर्वच क्षेत्रात रोखीच्या व्यवहाराऐवजी कॅशलेस व्यवहार करण्यास आता प्राधान्य दिले जात आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची रुग्णालय, दवाखान्यांमध्ये कॅशलेस व्यवहाराचा पर्याय प्रशासनाकडून दिला जात नाही. केसपेपर, उपचार बिलाची रक्कम जमा करताना रोख पैसे नसल्यास रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांना धावपळ करावी लागत आहे. पेपरलेस आणि स्मार्ट कारभाराचा दावा करणारे महापालिका प्रशासन रुग्णालयांमध्ये कॅशलेस बिलिंग अद्याप मागे असल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत १ एप्रिलपासून पेपरलेस कारभार सुरू झाला. यापुढे प्रशासनात फाईल किंवा प्रस्ताव कागदोपत्री न स्विकारण्याची भूमिका आयुक्त शेखर सिंह यांनी घेतली. वारंवार अडथळे येत असले, तरी संपूर्ण कारभार ई-ऑफीस प्रणालीवरून सुरु आहे. मात्र, महापालिकेची रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार सुरु करणे प्रशासनाला शक्य झालेले नाही, शहरातील नागरिकांसाठी महापालिकेची आठ मोठी रुग्णालये, ३० दवाखान्यांसह काही वैद्यकीय सुविधा अल्पदरात उपलब्ध आहेत.




महापालिकेच्या रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये दररोज हजारो रुग्णांवर उपचार होतात. मात्र, महापालिकेच्या सर्व रुग्णालयात रुग्णांच्या उपचारांचे पैसे ऑनलाइन स्वीकारण्याची व कॅशलेस व्यवहाराची सुविधा नाही. त्यामुळे अनेकवेळा रुग्णांकडे रोख पैसे नसल्याने वादा-वादीचे प्रसंग घडता. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून कॅशलेस आणि डिजिटल व्यवहार सुरु करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तर, रुग्णालयात कॅशलेस व्यवहार सुरु करण्यावर चर्चा होते. परंतु, निर्णयाअभावी अनेक वर्षे हा प्रस्ताव प्रलंबित आहे.

> महापालिकेच्या रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसा प्रस्ताव देखील तयार केलेला आहे. आर्थिक व महापालिकेच्या व्यवहाराशी संबधित बाब असल्याने ही व्यवहार प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. परंतु, तरी देखील लेखा व इतर संबधित विभागांसोबत चर्चा सुरू असून अद्याप कॅशलेस व्यवहार सुरु करण्याबाबत निर्णय झालेला नाही.
>
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, महानगरपालिका.**

# राजीव गांधी प्राणी उद्यानात 14 हरणांचा मृत्यू!

## वन्यजीवप्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण; प्राणी उद्यान प्रशासनालाही याचा मोठा धक्का

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज येथील प्रसिद्ध राजीव गांधी प्राणी उद्यानात मागील चार ते पाच दिवसांत तब्बल १४ हरणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे वन्यजीवप्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, प्राणी उद्यान प्रशासनालाही याचा मोठा धक्का बसला आहे.

उद्यानामध्ये सध्या एकूण ९८ हरिणे होती. त्यामधील १४ हरणे मृत अवस्थेत आढळून आली असून, त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही घटना समोर येताच प्राणी चिकित्सक तसेच वनविभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत.




प्राथमिक अंदाजानुसार हरणांचा मृत्यू कोणत्यातरी विषाणूजन्य आजार, अन्नातील बिघाड किंवा अचानक हवामान बदल यामुळे झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र याबाबत खात्रीशीर माहिती मिळवण्यासाठी मृत हरणांचे नमुने लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या तपासणी अहवालासाठी २ ते ३ दिवसांचा कालावधी लागणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> प्राणी संग्रहालयामध्ये सांभार, चितळ आणि हरणांचे कळप एकत्र राहत होते. मृतप्राण्यांच्या विच्छेदनानंतर येणाऱ्या अहवालात कारण स्पष्ट होईल. साथीच्या आजारामुळे 14 हरणांचा मृत्यू झाले असण्याची शक्यता आहे. मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे दोन दिवसांमध्ये अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर बोलता येईल.
>
> **- डॉ.राजकुमार जाधव, पशुवैद्यकीय अधिकारी आणि राजीव गांधी प्राणी संग्रहालय कात्रज.**

दरम्यान, या घटनेमुळे प्राणीप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, प्राणी उद्यानातील हरिणांच्या देखभाल व आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्राणी प्रेम करन करण्यात येत आहे. राजीव गांधी प्राणी उद्यान हे पुणेकरांसाठी आणि पर्यटकांसाठी एक महत्त्वाचे आकर्षण केंद्र आहे. अशा ठिकाणी प्राण्यांच्या मृत्यूच्या घटनांनी उद्यान प्रशासनाची कार्यपद्धती आणि दक्षतेवर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

# टोमॅटोचे भाव उतरल्याने शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

## नफा तर दूरच, गुंतवलेले भांडवल मिळणेही मुश्कील; मागणी कमी उत्पन्न अधिक

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या टोमॅटोचे भाव कमालीचे उतरल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात अक्षरशः पाणी आले असल्याचे चित्र दिसत आहे. बळीराजा शेतात मेहनत करून स्वकर्तृत्वासह कौशल्याने उत्पादन मिळवतो. परंतु समाधानकारक भाव मिळत नसल्याने आर्थिक चणचण त्याच्या नशिबी आहे. कमी कालावधीत अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या टोमॅटोचे यावर्षी भाव गडगडल्याने जुन्नरच्या तालुक्यातील गावातील शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे टोमॅटो उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

शेतकरी अल्पकाळात भरपूर व रोख उत्पन्न देणारी पिके म्हणून टोमॅटो हे पीक घेतात. टोमॅटोचे पीक नगदी व भांडवली असल्याने लागवडीपासून मागणी कमी अन् उत्पन्न जास्त आहे. एक एकरास



पाच हजार किलो पेक्षा अधिक उत्पन्न घेणारे शेतकरी या भागात आहेत. छोट्या छोट्या प्लॉटच्या साह्याने जास्तीत जास्त उत्पन्न घेऊन जीवन जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांचे टोमॅटोचे भाव घसरल्याने आर्थिक नुकसान होत आहे. या भागातील टोमॅटो नारायणगाव मार्केट येथे जातो. टोमॅटोची आवक वाढल्याने दर कॅरेटचे दर २०० ते ४५० रुपयांवर आले असून सरासरी जुन्या टोमॅटोंना २०० ते ३०० रुपये बाजार आहेत. मागणी कमी उत्पन्न अधिक अशी परिस्थिती आहे. अवकाळीमुळे पिकांचे नुकसान झालेले असताना देखील काही शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पीक वाढवले. परंतु, त्याचे दर घसरल्याने शेतकरी कोसळू लागला आहे. केलेला खर्चही निघत नसल्याची खंत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

लागवडीपासून प्रत्यक्ष उत्पन्न सुरू होईपर्यंत या पिकाची खूपच काळजी घ्यावी लागते. किटकनाशक फवारणी, मशागत, खतांचा खर्च असतोच. आधार देण्यासाठी लागणाऱ्या काठ्या व तारा, सुतळ्या आणि त्यासाठी द्यावी लागणारी मंजूरी. ज्यावेळी प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात होते त्यावेळी ही खर्च मोठ्या प्रमाणात होतो. परंतु, याहीपेक्षा खर्चिक काम असते ते टोमॅटो झाडांना फळे आल्यानंतर नजीकच्या काळात दरात वाढ झाली नाही तर शेतकऱ्यांचे लाखो रूपयांचे नुकसान होईल. शेतकरी स्थानिक बाजारपेठेत टोमॅटो विकत असून पण काही टोमॅटो उत्पादक यांनी दर नसल्याने टोमॅटो शेतात ठेवणे पसंत केले

### टोमॅटो फेकून देण्याची वेळ

**» दरवर्षी बाजारभाव चांगले असतात यंदा मात्र सुरुवातीपासूनच टोमॅटोला बाजारभावाची साथ मिळालीच नाही. सुरुवातीला कॅरेटला ८०० रुपये भाव होते. नंतर ५००, ४५०, ३००,१५०,२०० असे दिवसागणित बाजार बदलत आहेत. यंदा उष्णतेचे अधिक प्रमाण त्यात अवकाळी पाऊस व मे महिन्यात आलेल्या सततच्या पावसामुळे टोमॅटो पांढरी माशी, करपा, काळा डाग आदी रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला. त्यातच बाजारभाव देखील कमी मिळाले त्यामुळे फेकून देण्याची वेळ आली आहे.**

### भांडवल निघणे कठीण

**» २० किलोच्या क्रेटला केवळ २०० ते ४५० रुपये भाव मिळत आहे. पण सरासरी एकरी दिड लाख रुपये भांडवल खर्च या दरातून गुंतविलेले भांडवल तर दूरच, तोडणी मजुरी, वाहतुकीचा खर्च देखील वसूल होत नसल्याचे टोमॅटो फेकून देण्याची वेळ आली आहे. टोमॅटो हे पीक शेतकऱ्यांना कधी मालामाल तर कधी उद्ध्वस्त करणारे बेभरवशाचे पीक झाले आहे.**